P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - १७/१०/२०२३

## दि.१६/१०/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १००८/२०२३, भादंवि कलम ३०२, २०१, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०५/१०/२०२३ रोजी २३.०० वा. चे सुमा. मल्हारनगर कॉलनी नं.०५, थेरगांव वाकड पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १६/१०/२०२३ रोजी १२.१९ वा |
| फिर्यादी | :- | सचिन शांताराम चव्हाण, पोलीस उप निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | १)पंकज रतन पाचपिंडे वय २८ वर्षे रा. जय मल्हार कॉलनी नं.०५, थेरगांव, पुणे<br>२)अमरदीप ऊर्फ लखन दशरथ जोगदंड वय ३३ वर्षे रा. म्हातोबा बारणे यांची खोली चांदणी चौक, थेरगांव, गावठाण **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी आपसात संगणमत करुन इसम नामे सुरज किशोर कांबळे वय ३० वर्षे रा. जगतापनगर लेन नं.५ थेरगांव, पुणे. याचा शिवीगाळ केल्याचे कारणावरुन चाकुने गळयावर वार करुन खून केला व त्याची मयत बॉडी पुरावा नष्ट करण्याचे हेतुने टेम्पोतुन बावधन येथे नेवुन कोठेतरी टाकुन दिली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि दाभाडे ९८८१२८९४८३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी १०३५ /२०२३ भादंवि कलम ३०७, ३२३, ५०४, भारतीय हत्यार कायदा कलम ४, २७, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१६/१०/२०२३ रोजी १४/०० वा.चे सुमा.ओपन लॉन्स, माध्यमिक विद्यालय, पिंपरीगाव, पुणे येथे सार्वजनिक रोडवर |
| गुन्हा दाखल | :- | दि१६/१०/२०२३ रोजी २१.३५ वा |
| फिर्यादी | :- | आकाश ज्ञानेश्वर उईके, वय २५ वर्षे, धंदा बेरोजगार,शिक्षण १० वी,रा.मारुती कुदळे यांच्या भाडयाच्या खोलीत, कुदळे कॉलनी नं २, नवमहाराष्ट्र शाळेसमोर, पिंपरीगाव, पुणे. |
| आरोपी | :- | अभि सुनिल कापसे, वय अंदाजे २५ वर्षे, रा.श्रीधन फेज २, सौदर्य चौक, पिंपरीगाव, पुणे.<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने यातील जखमी नामे ऋषिकेश ऊर्फ मोन्या श्यामराव वाघेरे, वय २४ वर्षे, रा. कस्पटेवस्ती, वाकड, पुणे यास फोन करून नमूद केले ठिकाणी बोलावून घेवून, जखमी याची मानलेली बहीण हिच्याशी झालेल्या वादाचा जखमीने जाब विचारला या कारणावरून वाद घालून शिवीगाळ व धक्काबुक्की करून जखमी यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने तलवारीने त्याचे डोक्यात, तोंडावर व हातावर वार करुन गंभीर जखमी केले आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोनि पलांडे ७७७४००२७१० |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ८०३/२०२३ भा.द.वि. क ३०६,५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१४/०६/२०२३ रोजी १८.०० वा मयताचे राहते घरात रामनगर, सी विंग, फ्लॅट क्रमांक १६, गव्हाणेवस्ती भोसरी पुणे येथे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.१६/१०/२०२३ वेळ-२३/११ वा |
| फिर्यादी | :- | सागर भिमसिंग पाटील वय ३० वर्ष धंदाशिक्षक रा- मु. कल्याणे होळ, पो.पिंपरी ता धरणगाव जि. जळगाव |
| आरोपी | :- | निरज व्दीवेदी पुर्ण नाव पत्ता माहीती नाही एस.एच.जे- इंन्टेल.टेक. प्राली कंपनी ५०६ सेखर सेंन्ट्रल, ४-५ मनोरमा गंज ए.बी रोड इंदोर, मध्यप्रदेश पिन क्रमांक -४५२००१. या कंपनीचे ऑपरेशन मॅनेजर<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा लहान भाऊ मयत नामे सुशिल भिमसिंग पाटील वय २७ वर्ष यास त्याचे एस.एच.जे- इंन्टेल.टेक. प्राली कंपनी ५०६ सेखर सेंन्ट्रल, ४-५ मनोरमा गंज ए.बी रोड इंदोर, मध्यप्रदेश या कंपनीचे ऑपरेशन मॅनेजर आरोपी यांनी त्यास तो फिर्यादी यांचे गावी इंटरनेटचा प्रॉब्लेम असल्यामुळे तो घरी राहुन वर्क फॉर्म होम काम करीत असताना त्यास कामाचा वेळ संपला तरी त्यास काम करण्यास भाग पाडत असत व काम वेळेत झाले नाही तरी त्यास वेळोवेळी धमकी देत असत की, त्यास त्याचे म्हणण्या प्रमाणे किंवा ओव्हर टाईम न केल्यास poor remark असा शेरा देवुन नोकरी वरुन काढुन टाकीन व त्यानंतर त्यास कोठेही नोकरी मिळणार नाही असे बोलुन धमकी देवुन मानसिक त्रास दिलेला असुन त्याचे काम चांगले असुनही त्यास आठ महीन्यांत वेगवेगळया प्रोजेक्टवर बळजबरीने काम करण्यास भाग पाडुन त्याने तसे केले नाही म्हणुन तसेच त्याच दरम्यान त्याचे कामामध्ये Static IP issue& Postman issue येवु लागले त्यामुळे त्याला दिलेल्या कामात अडचणी येवु लागल्याने आरोपी यांनी त्यास कोणत्याही प्रकारचे नोटीस न देता कामावरुन काढुन टाकल्याने व वारंवार मानसिक व शारीरीक त्रास देवुन त्यास त्यांचे पासुन होणारे त्रासाला कंटाळुन त्यास आत्महत्या करणेस प्रवृत्त केल्याने त्याने दिनांक १४/०६/२०२३ रोजी त्याचे राहते घरात गळफास घेवुन आत्महत्या केलेली आहे. त्याचे मरणास आरोपी हेच कारणीभुत आहेत म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ५३३/२०२३ भा.द.वि.कलम १४१,१४२,१४३,१४६,१४७,३४२,४२७,४४७,५०४,५०६,३४ भादवि सह क्रिमीनल लॉ. अमेन्टमेंट कलम ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/१०/२०२३ रोजी २३/४५ ते दि.१६/१०/२०२३ रोजीचे ०२/३० वा. रात्रीच्या दरम्यान तळेगाव-चाकण रोड, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.१६/१०/२०२३ रोजी २३.५५ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | राजेंद्र बाळासाहेब जांभुळकर वय ५० वर्षे रा.तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे आणि<br>अनोळखी १५-२० साथीदार **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने त्याचे अनोळखी १५-२० साथीदारांसह फिर्यादी आणि त्यांचे पतीचे मालकीच्या अभिजीत लॉजची पश्चिम दिशेची बाजुकडील भिंतीवरून उडया मारून प्रवेश करून फिर्यादीचे लॉजमधील कामगार यांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिलेली आहे तसेच कामगारांना अभिजीत लॉजचे किचन रूममध्ये कोंडुन ठेवलेले आहे. त्यानंतर आरोपी आणि त्याचे अनोळखी १५-२० साथीदार यांनी त्यांचे ताब्यातील दोन जे.सी. बी. मशीनव्दारे अभिजीत लॉजची पश्चिम दिशेची भिंत, पाण्याची टाकी, बोअर, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे यांची वायर यांचे तोडुन-फोडुन नुकसान केलेले आहे तसेच सदर परिसरात दहशत पसरवलेली आहे आणि अभिजीत लॉजची पश्चिम दिशेची बाजुकडे पर्त्याचे कम्पांउंड लावलेले आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मदेवाड ९९२२२९४७५६ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०१२/२०२३ भा.द.वि.क. ३०६, ३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२५/८/२०२३ रोजी २०/४५ वा.चे सुमा. समता कॉलनी, थेरगाव येथील विनोद दुबे यांचे भाडयाचे |

खोलीमध्ये, थेरगाव पुणे

गुन्हा दाखल :- दि.१६/१०/२०२३ रोजी २१.११ वा.

फिर्यादी :- राजकुमार धनीराम शर्मा वय ३८ वर्षे, धंदा-टाईल्सकाम रा.पंचमुखी गणेश मंदीराचे समोर थेरगाव पुणे मुळ रा.तिंदोखर,ता.जौहराजि.मुरैना, राज्य मध्य प्रदेश

आरोपी :- १)कृपाशंकर शर्मा वय ६० वर्षे, अंदाजे,
२)महिला आरोपी,
३)पंकज कृपाशंकर शर्मा वय ३६ वर्षे अंदाजे, सर्व रा. देवगड थाना, ता.जौहरा, जि. मुरैना, राज्य मध्य प्रदेश,
४)महिला आरोपी
५)राघबिंद परमार वय २८ वर्षे अंदाजे दोन्ही रा.तिंदोखर, ता.जौहरा जि.मुरैना, राज्य मध्य प्रदेश
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचा भाऊ मुकेश धनीराम शर्मा वय ३४ वर्षे यास त्याचे सासरकडील लोक आरोपी क्र १ ते ५ यांनी त्यांचेकडुन घेतलेले पैसे त्याला परत देत नसल्याचे कारणावरुन त्यास शारीरीक व मानसिक त्रास दिल्याने त्यांचे त्रासाला कंटाळुन दिनांक २५/८/२०२३ रोजी सायंकाळी ०८/४५ वा.चे सुमारास फिर्यादी यांचा भाउ मुकेश शर्मा याने त्याच्या समता कॉलनी थेरगाव येथील राहत्या घरामध्ये सिलिंग फॅनला वायरने गळफास घेऊन आत्महत्या केली असुन त्यास आरोपी क्र १ ते ५ यांनी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि नाईकनिंबाळकर ९८८१२५२९३०

**०६.**

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे ६२५/२०२३ भा द वि स कलम ३०४ (अ) मो वा काकलम २७९

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१६/१०/२०२३ रोजी सकाळी ०७/०५ वा चे सूमारास भांबोलीते तळेगाव जाणारे रोडवरकिन्फाकंपनीचेकंम्पाऊंडचे जवळील रोडवर मौजे भांबोलीता-ेड जि-पूणे

गुन्हा दाखल :- दि.१६/१०/२०२३ रोजी१८.२० वा

फिर्यादी :- सोनू धनपत गोश्वामी वय २६ वर्षे व्यवसाय- कंडक्टर रा-भरियार पो-जोगियाथाना-किश्ना वरम जिल्हा-बक्सर राज्य-बिहार

आरोपी :- कंटेनर गाडी नं एम ४३ बी एक्स ४३७८ वरील चालक नामे धनाजी दरोगा सोनार वर्मा वय ३५ रा-दुबौली जिल्हा-बक्सर राज्य-बिहार
**आरोपी मयत आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे कंटेनर नं एम ४३ बी एक्स ४३७८ हिचेवर वाहाक म्हणून कामास आहे. आरोपी याने त्याचे ताब्यातील कंटेनर नं एम ४३ बी एक्स ४३७८ हा रस्त्याचे परिस्थितीकडे दूलर्क्ष करूण चालवूण सदर ठिकाणी दोन रस्ते असल्याने आरोपी याने सुरूवातीला गाडी डावे बाजूला व आचानक जोराने उजवे बाजूला घेत असताना गाडी पलटी होवू लागल्याने त्याने जोरात ब्रेक दाबला त्यामूळे गाडी उजवे बाजूस डिव्हाईडवर ड्रायव्हर साईटने पलटी झाल्याने व डिव्हाईडरला कंटेनर घासत गेल्याने यातील आरोपीचे डोक्याचा पूर्णपणे चेंदामेंदा झाल्याने त्यास उपचारकामी ॲम्ब्यूलन्स मधून उपचारकामी चाकण ग्रामीण रूग्नालय चाकण येथे नेले असता तेथे डॉक्टर यांनी त्यास तपासूण तो औषध उपचारापूर्वी मयत झालेचे घोषीत केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोफौ मोरे ८४४६४४६५२९

**०७.**

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड १०१०/२०२३ भा.द.वि.कलम ३०४ (अ)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३/१०/२०२३ रोजी १५/३० वा.चे सुमारास सिल्व्हर क्रिस्टल चालु बिल्डिंग, दुसरा मजला व अकरावा मजला, अतिथी हॉटेल समोर, थेरगांव, पुणे

गुन्हा दाखल :- दि.१६/१०/२०२३ रोजी १९.२२ वा.

फिर्यादी :- रोहीत राजेंद्र दिवटे पोलीस उपनिरीक्षक वाकड पोलीस स्टेशन पिंपरी-चिंचवड आयुक्तालय

आरोपी :- १)ठेकेदार नामे जितेंद्र बाळकृष्ण कोतकर रा. शॉप नं.५, सोपानबाग सोसायटी जवळ, पंचवटी, पाषाण पुणे व

२) त्यांचे पार्टनर रणजित दिलीपराव बनकर
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील मयत इसम नामे राम नरेश यादव वय ४१ वर्षे हा सदर ठिकाणी ११ व्या मजल्यावर सेट्रींगचे सामान आणायला गेला होता. त्यावेळी त्याचा तोल जाऊन तो प्लबिंगच्या डक्टमध्ये पडला होता. त्यावेळी ९ व्या मजल्यावर सेफ्टी जाळी लावली होती. त्या जाळीवर पडुन तो जाळीसह खाली बिल्डिंगच्या २ -या मजल्यावरील प्लबिंगच्या डक्टमध्ये पडुन त्याच्या मेंदुला मार लागल्याने मयत झाला आहे. यामध्ये सदर जाळीची पाहणी केली असता सदर जाळी ही निकृष्ट दर्जाची झाली असुन ती पुर्णपणे व्यवस्थित ताईट लावलेली नसल्यामुळे सदर मयत इसम हा त्या जाळीवर पडल्यावर तेथे अडकुन राहीला नाही तो जाळीसहीत खाली गेला तसेच ठेकेदार यांनी १२ व्या मजल्यावर काम चालु होते त्यावेळेस फक्त ९ व्या मजल्यावरील डक्टमध्ये एक निकृष्ठ दर्जाची जाळी लावलेली होती त्याचा वेळोवेळी कोणत्याही प्रकारे मेंटेनन्स केला नाही. ठेकेदार यांनी आणखीन दोन-तीन जाळया प्लबिंगच्या डक्टमध्ये बसविणे गरजेचे होते सदरच्या जाळया हया न बसविल्यामुळे यातील मयत कामगार हा बिल्डिंगच्या दुस-या मजल्यावरील डक्टमध्ये पडुन मयत झाला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा रावते ८२०८९२११३८७

०८.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण ८१२/२०२३ भारतीय दंड संहिता कलम ४२०,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २८/१०/२०२० रोजी ते दि.२२/०१/२०२३ रोजीचे दरम्यान मौजे चाकण गावचे हद्दीत चाकण तळेगाव रोडवर चाकण बिर्याणी हाऊस व श्री गणेश खानावळ मध्ये ता.खेड,जि.पूणे

गुन्हा दाखल :- दि. १६/१०/२०२३ रोजी १९.५५ वा

फिर्यादी :- सोमनाथ तम्मा काटगावकर वय-३३ वर्षे धंदा-नोकरी, रा. फलॅट नंबर ११०३, जेके बिल्डींग, के-विंग आयफेल सिटी चाकण ,ता.खेड,जि.पूणे

आरोपी :- १)इराण्णा बालाप्पा होसमनी
२)संगिता इराण्णा होसमनी दोन्ही रा. रा. सेजल होम प्लॅट नंबर २०१ नाणेकरवाडी ता खेड जि पुणे मुळ गाव गोकाक ता. गोकाक राज्य कर्नाटक
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपीत मजकुर यानी संगनमताने यातील फिर्यादी व साक्षीदार यांना हॉटेलचे व्यवसायामध्ये पार्टनरशिप मध्ये विश्वासाने घेतो म्हणून त्यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादीकडुन ऑनलाईन २५०,९,७१४/- अक्षरी (पंचवीस लाख नउ हजार सातशे चैदा रूपये), हॉटेल मॅनेजर स्तिक नवनाथ सोंडेकर याचेकडून ३,५०,०००/- अक्षरी (तीन लाख पन्नास हजार रूपये) व किराणा माल विक्रेता हिरालाल नथाराम चैधरी याचे किराणा मालाची उधारी ११,००,०००/- अक्षरी (अकरा लाख रूपये), कुणाल नारायण चकोर याचे ३८,५०,०००/- (अडतीस लाख पन्नास हजार रूपये) असे फिर्यादी व साक्षीदार यांचेकडुन एकूण ७८,०९,७१४/-अक्षरी (अष्टयाहत्तर लाख नउ हजार सातशे चैदा रूपये) एवढी रक्कम विश्वासाने घेउन ती परत न करता त्यांची फसवणुक करुन पळुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गायकवाड ९६८९३२३१२३

०९.

पोस्टे व गु रजि.नं. :- हिंजवडी ११६५/२०२३ भा.द.वि. कलम ३७९, ५११

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. १६/१०/२०२३ रोजी मध्यराञी ०१.३० वा.चे सुमारास टेक महिंद्रा कंपनीचे मागे, स.नं. १८८, माण, हिंजवडी फेज-३, ता.मुळशी, जि.पुणे येथील

गुन्हा दाखल :- दि.१६/१०/२०२३ रोजी १५/५५ वा.

फिर्यादी :- संजय चंद्रभुषण पाठक, वय ४४ वर्षे, धंदा-नोकरी, रा. स.नं. ६९, रोड नं.२, यमाईनगर, साई पार्क, दिघी, पुणे,

आरोपी :- १) श्याम वसंत देवरे, वय-३६ वर्षे, धंदा-ड्रायव्हर, रा मोरे वस्ती, गोरे यांची रुम, साने चौक, चिखली,
२) भुपेंद्र संजय चित्ते, वय-२२ वर्षे, धंदा-नोकरी, रा. संतोष स्मृती बिल्डींग, बोराडे चाळ, अग्निशामक चौक, मोशी, पुणे,

| | | |
|---|---|---|
| | | ३) अक्षय सुदाम पवार, वय-२३ वर्षे, धंदा-नोकरी, रा. शास्त्री चौक, आळंदी रोड, रामनगर, भोसरी, पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी क्र १ ते ३ यांनी फिर्यादी यांचे कंपनीचे इंटस टॉवर नं. १०७५२४५ येथील व्होडाफोन आयडीआयचे बी टी एस मधुन ४ रुसकार्ड व १ बेसबेंड ६६३० बाहेर काढुन ते फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने चोरण्याचा प्रयत्न करीत असताना मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि देशमुख ९४२००५७१७३ |

**१०.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ४९९ /२०२३ भा. द. वि कलम ४२०, ४०६, ५०६, ३४ व माहिती तत्रंज्ञान अधिनियम कलम ६६(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०६/२०२३ रोजी ता. दि.१८/०७/२०२३ रोजी पर्यंत गायकवाडनगर, मानसिंगराव पाटील चाळ जवळ, गंगोत्री हॉस्पीटल, आळंदी रोड, दिघी, पुणे याठिकाणी ऑनलाईन |
| गुन्हा दाखल | :- | दि.१६/१०/२०२३ रोजी २१/४१ वा. |
| फिर्यादी | :- | मयुरेश मारुती पाटील वय २८ वर्षे, व्यवसाय-नोकरी, सध्या रा. गायकवाडनगर, मानसिंगराव पाटील चाळ जवळ, गंगोत्री हॉस्पीटल, आळंदी रोड, दिघी, पुणे मुळगांव-मु. पो. लाखठाणे, ता. वाळवा, जि. सांगली |
| आरोपी | :- | **युपीआय आयडी नं.** १) ७९७६७९४९७५ m@pnb_२)८८२५३२४९७५ m@pnb ३)amsanamsan6-2@oksbi ४)nskakavabaoop@equitas ५)ajay.3214@paytm ६)९०५४७००३२९ .imb@icici ७)universeexport1@barodampay ८) fiyona677@uco ९)universeexport@airtel **बँक खाते नं.** १०)आयसीआयसी् आय बँक खाते नं. ००१७०५०१५२६८ ११) पंजाब नॅशनल बँक खाते नं. ७४७६००२१०००००१३०१ १२) पंजाब नॅशनल बँक खाते नं. ०४१८१०२१००००००५९१ १३)आयसीआयसी आय बँक खाते नं. ०२१८०५५००२३१ |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना वेगवेगळया व्हॉटसअप वरून मॅसेज पाठवून आरोपी यांनी वेगवेगळे टेलिग्राम आयडी पाठवून त्यावर व्हिडीओ पाठवून त्यांना लाईक करण्यास सांगून त्यांनी फिर्यादी यांचे बँक ऑफ महाराष्ट्र खाते नं. ६८०००८१५००६६ यावर २१,२७०/- रू पैसे पाठवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून नंतर वेगवेगळया टेलिग्राम आयडीवर वेगवेगळे इन्स्टाग्रॅम आयडी पाठवून त्यांना लाईक करण्यास सांगून त्यांनी फिर्यादी यांना पैसे भरण्यास सांगून त्याचे तुमच्या एमईएक्ससी फ्लॅटफॉर्म युआरएल नं. http://tjjck.com खात्यावर पैसे जमा झालेले दिसतील असे खोटे सांगून फिर्यादी यांना त्यांचे वेगवेगळे युपीआय आयडी व वेगवेगळे बँक खाते यावर पैसे भरण्यास सांगून ते पैसे भरले नाही म्हणून फिर्यादी यांना खोटे लोन दिल्याचे दाखवून त्यांचे लोन भरले नाही म्हणून त्यांनी फिर्यादी यांना तसेच त्यांचे कुंटूबाला त्रास देण्याची तसेच तुमच्या नोकरीच्या ठिकाणी कळवून तुमची नोकरी घालविण्याची धमकी दिल्यामुळे फिर्यादी यांनी त्यांना घाबरून त्यांचे १) युनियन बँक खाते नं. ३६०००२०१०२१२३६५ २) कॅनरा बँक खाते नं. ३१२४१०१००६३३८ या खात्यावरून एकूण २,६४,४००/- रू त्यांचे युपीआय आयडी व बँक खात्यावर भरले असुन त्यांनी त्यांची ओळख लपवून फिर्यादी यांची ऑनलाईन २,४३,१३०/- रू फसवणूक केली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | वपोनि पंडीत ७२४९४२९९४२ |

**११.**

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिंचवड ४८६/२०२३ भा.दं. वि. कलम ४०६, ४२० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.३१/०५/२०२३ रोजी १४/१५ वा.बँक ऑफ महाराष्ट्र एटीएम, चिंचवडगाव |
| गुन्हा दाखल | :- | दि.१६/१०/२०२३ रोजी १८/०४ वा |
| फिर्यादी | :- | विवेक वासुदेव कुंभोजकर वय ५९ वर्षे , धंदा—व्यवसाय , रा.देवघर सोसायटी स, चिंचवड पुणे |
| आरोपी | :- | अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे पैसे काढण्यासाठी चिंचवडगाव, चिंचवड येथील महाराष्ट्र बँकेच्या एटीममध्ये गेले असता तेथे फिर्यादी हे ५,००० रूपये काढुन खिशात ठेवत असताना त्यांचे पाठीमागे उभा असणारा अनोळखी इसमाने त्यांना बोलण्याध्ये गुंतवून ठेवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादीचे एटीएम मशिनमध्ये असणारे ओरिजनल बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे एटीएम कार्ड स्वताकडे ठेवुन त्याचेकडे असलेले |

दुसरे कोणाचेतरी एटीएमकार्ड फिर्यादीचे हातात देवून त्यानंतर फिर्यादी यांचे बॅंक ऑफ महाराष्ट्र बॅंकेच्या अकाऊंटवरून २७,२४० रूपये काढुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणूक केली म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि झडते ९१३००५२७१४

१२.

पोस्टे व गु रजि.नं. :- पिंपरी १०३४/२०२३, भा.दं.वि. कलम ५०६, ५०४, भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१६/१०/२०२३ रोजी ०३.१५ वा. एच.पी. पेट्रोल पंपा शेजारी, एच ए मैदान भिंती लगत, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे येथे

गुन्हा दाखल :- दि.१६/१०/२०२३ रोजी १३.३१ वा.

फिर्यादी :- रमेश भागोजी दोरताले, वय ३८ वर्षे, पोलीस शिपाई ३२२१, नेमणुक पिंपरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड

आरोपी :- सचिन सल्वराज स्वामी वय २५ वर्षे, रा. ययाती सोसायटी, संत तुकाराम नगर, पिंपरी पुणे
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने आपले स्वतःचे कब्जात १००/- रूपये किंमतीचा एक लोखंडी सुरा असे घातक हत्यार विनापरवाना अनाधिकृतरीत्या बाळगताना मिळून आला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि निळकंठ ९८२२१३२१३७